# जाहीर सुचना

## वैद्यकीय अधिकारी (एमबीबीएस), स्टाफ नर्स व एमपीडब्ल्यु या पदाकरीता

### गुणानुक्रमे संवर्गनिहाय पात्र ठरलेल्या उमेदवारांची मुळ कागदपत्र पडताळणी व समुपदेशन

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत वैद्यकीय अधिकारी (एमबीबीएस), स्टाफ नर्स व एमपीडब्ल्यु या पदाकरीता दिनांक १३/०६/२०२२ ते २४/०६/२०२२ पर्यंत अर्ज मागविण्यात आलेले होते. त्या अनुषंगाने वैद्यकीय अधिकारी (एमबीबीएस), स्टाफ नर्स व एमपीडब्ल्यु पदासाठी प्राप्त झालेल्या अर्जाच्या आधारे वैद्यकीय अधिकारी (एमबीबीएस), स्टाफ नर्स व एमपीडब्ल्यु पदांच्या पात्र उमेदवारांची यादी व अपात्र उमेदवारांची यादी, जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली होती. त्या अनुषंगाने वैद्यकीय अधिकारी (एमबीबीएस), स्टाफ नर्स व एमपीडब्ल्यु या पदाकरीता गुणानुक्रमे मुळ कागदपत्र पडताळणी व समुपदेशन करीता उमेदवारांची यादी जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

तरी याद्वारे वैद्यकीय अधिकारी (एमबीबीएस), स्टाफ नर्स व एमपीडब्ल्यु या पदांच्या यादीतील उमेदवारांना सुचित करण्यात येते की, खालील उमेदवारांनी त्यांच्या मुळ कागदपत्र व अनुभव प्रमाणपत्र सक्षम अधिकारी यांच्या स्वाक्षरीचे कागदपत्र पडताळणीच्या वेळेस तपासणी करीता उपलब्ध करुन देण्यात यावे. अन्यथा आपण सादर केलेल्या अनुभव प्रमाणपत्राच्या छायाकिंत प्रतीच्या आधारे अनुभवासाठी देण्यात आलेले गुण गृहित धरण्यात येणार नाहीत व देण्यात आलेले गुण कमी करण्यात येतील याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**मुळ कागदपत्र पडताळणी व समुपदेशन तक्ता**

| अ.क्र. | पदाचे नांव | दिनांक | वेळ | स्थळ |
|---|---|---|---|---|
| १ | स्टाफ नर्स | २८/०९/२०२२ | सकाळी १०.०० वा. | यशवंतराव चव्हाण सभागृह, जि.प. लातूर |
| २ | वैद्यकीय अधिकारी (एमबीबीएस) | २९/०९/२०२२ | सकाळी १०.०० वा. | यशवंतराव चव्हाण सभागृह, जि.प. लातूर |
| ३ | एमपीडब्ल्यु | २९/०९/२०२२ | सकाळी १०.०० वा. | यशवंतराव चव्हाण सभागृह, जि.प. लातूर |

सदर यादीतील उमेदवारांना गुणानुक्रमे प्रवर्गनिहाय १:३ (एकास तीन) या प्रमाणे कागदपत्र पडताळणीकरीता बोलविण्यात येत असून उमेदवाराच्या मुळ कागदपत्राच्या पडताळणी नंतर प्रवर्गनिहाय अंतिम गुणवत्ता यादी तयार करुन त्याच दिवशी रिक्त असलेल्या ठिकाणी गुणवत्तेनूसार समुपदेशनाद्वारे निवड करण्यात येईल.

**वरील दिलेल्या तक्त्यानूसार समुपदेशानाच्या दिनांक व वेळेत उमेदवारांने उपस्थित राहणे बंधनकारक आहे. तदनंतर उपस्थित राहणा-या उमेदवारांचा विचार केला जाणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.**

सोबत :- **वैद्यकीय अधिकारी (एमबीबीएस), स्टाफ नर्स व एमपीडब्ल्यु या पदाची एकास तीन प्रमाणे संवर्गनिहाय उमेदवारांची यादी**

(डॉ. एच.व्ही. वडगावे)
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद, लातूर